# प्रकरण दुसरे

# मारुती चितमपल्लींचे साहित्यातील योगदान

## प्रकरण दुसरे

# मारुती चितमपल्लींचे साहित्यातील योगदान

### १. ललित साहित्याची वैशिष्ट्ये :–

प्रत्येक साहित्य हे आपली स्वतःची अशी काही खास वैशिष्ट्ये घेऊन जन्माला येत असते. ललित साहित्याचीही अशीच काही वैशिष्ट्ये आहेत.

### ललित साहित्य हे आत्मनिष्ठ साहित्य असते :–

लेखक रा. ग. जाधव यांच्या मते, "ललित साहित्यामध्ये आत्मनिष्ठा असते."[१] ललित साहित्य हे लेखक/कवींच्या जीवनाचे प्रतिबिंब असते म्हणजेच दुसऱ्या शब्दात ललित साहित्य हा एका दृष्टीने साहित्यिकांचा आत्माविष्कार होय. लेखकाच्या किंवा कवीच्या कलाकृतीतून तो स्वतःच्या आवडी–निवडी, जीवनप्रणाली, जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन व्यक्त करीत असतो म्हणूनच आत्मनिष्ठता ही अशा साहित्याचे प्रधान वैशिष्ट्य ठरते. इतर साहित्य मात्र वस्तुनिष्ठ साहित्य असते. त्याचा लेखक हा लेखन करताना आपल्या आवडीनिवडी, स्वभाव, विचार बाजूस ठेवतो. ललित साहित्यातील आत्मनिष्ठेचे विविध अर्थ करण्यात आलेले आहेत. सामान्यतः आत्मनिष्ठेच्या कल्पनेचा उदय हा समाजातील व्यक्तिवादाच्या उदयाशी निगडित आहे असे मानावयास हरकत नाही. विज्ञानाचा लक्षणीय विकास व यंत्रप्रधान औद्योगिक संस्कृती यांच्याबरोबरच जुन्या मध्ययुगीन सरंजामशाहीचा व कृषीप्रधान संस्कृतीचा झपाट्याने लोप होऊ लागला. हे सांस्कृतिक व सामाजिक स्थित्यंतर युरोपियन देशात पौर्वात्य देशापेक्षा अगोदर घडले व त्या देशात वाङ्मयातील 'रोमँटिसिझम' चा उदय झाला. मराठीच्या संदर्भात बोलायचे तर 'रोमँटिसिझम' च्या काही कल्पना १९ व्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात रुजू लागल्या. या रोमँटिसिझमच्या मागची मूळ प्रेरणा व्यक्तिवादाची आहे. 'विश्वाचा विस्तार केवढा। ज्याच्या त्याच्या डोक्याइतुका' हा केशवसुताचा विचार म्हणजे व्यक्तिवादाची मराठी वाङ्मयातील उघड घोषणा होय. व्यक्तिवादाने व्यक्तीचे अस्तित्व व महत्व कमीत कमी समाजसापेक्ष व स्वरूपावर एवढेच नव्हे तर वाङ्मयाच्या आकलन आस्वाद मूल्यमापन यावरही मोठा प्रभाव पडला व यातूनच 'आत्मनिष्ठे'चे वाङ्मयीन मूल्य प्रस्थापित झाले.

## ललित साहित्यात प्रतिकांचा वापर केला जातो :-

याविषयी रा. ग. जाधव असे म्हणतात, "ललित वाङ्मयातील प्रतिके पुष्कळदा या समाजात रूढ झालेल्या चिन्हांच्या आधारेही निर्माण होतात; आपल्याकडील देव, दानव, मदन, अवतार, प्रलयकाळ वगैरे गोष्टींचा उपयोग कवी/लेखक करत असतात. प्रतिके वाङ्मयातील आशय समांतर साम्यदर्शनाने अधिकच उठावदार करतात. ही प्रतिके प्रतिबिंबासारखी असतात म्हणून काहीशी अलंकरणासारखीही असतात."[२] म्हणजेच ललित वाङ्मयातील काही प्रतिके ही एखाद्या वाङ्मयीन कालखंडाशी निगडित असतात. मराठीतील संतांच्या कवितेत विरहिणी, राधाकृष्ण, विठाई माऊली यासारखी विशिष्ट अर्थाची प्रतिके रूढ झाली. या प्रतिकांचा पुनःपुन्हा व पुष्कळ लेखक/कवींनी वापर केल्याने त्यांचा अर्थ सुबोधपणे कळू शकतो. कवी/लेखकाला अभिप्रेत असलेली काही प्रतिके ही काहीशी व्यक्तिगत व विशिष्ट असली तरी त्या प्रतिकांमागील प्रतिकेय किंवा मूळ अनुभव हा सर्वपरिचित असल्यास ती प्रतिके सुबोध ठरतात. मात्र अशा प्रतिकांच्या बाबतीत महत्वाची गोष्ट अशी आहे की, ती प्रतिके त्या त्या लेखक/कवींच्या आत्मीय कलाप्रवृत्तीचे दर्शन घडवितात.

## ललित साहित्य हे प्रतिमांनी नटलेले साहित्य असते :-

हे एक ललित साहित्याचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी लेखक रा. ग. जाधव म्हणतात, "कथासाहित्याच्या संदर्भात 'प्रतिमा म्हणजे ललित साहित्य' ही कल्पना यथार्थपणे उपयोजिली असता 'रथचक्र' ही एक प्रतिमा आहे. या प्रतिमेची रूपे 'रथचक्र' नावाच्या कादंबरीत रेखाटली आहेत. या कादंबरीतील जीवनाचे सर्व चित्रण 'रथचक्र' या प्रतिमेने आपल्या उरात साठवलेले आहे."[3] कवी/लेखकाला होणारे जीवनाचे आकलन हे प्रतिकात्मक असते, चित्ररूपात्मक असते या अर्थाने ललित साहित्य ही एक प्रतिमा आहे असे म्हटले जाते. प्रतिमेचा हा व्यापक व संश्लेषणात्मक अर्थ महत्वाचा आहे. अलंकार हे मूलतः विश्लेषणात्मक म्हणून भागशः महत्वाचे असतात. प्रतिमात अनुभवाचे साकल्यदर्शन महत्वाचे असते म्हणजे अलंकाराच्या अभिज्ञतेने ललित साहित्यातील अनुभवाचे त्रुटीत व त्रोटक स्वरूप कळले तरी अनुभवाच्या समग्र स्वरूपाकडे दुर्लक्ष होते व म्हणून त्या अनुभवाचा भागशः आस्वाद घेतला जाते. प्रतिमा या अनुभवातील प्रभावी घटकांचे समग्र दर्शन घडवितात.

**ललित साहित्य हे भावनेला हात घालणारे साहित्य असते. :-**

हे एक ललित साहित्याचे वैशिष्ट्य आहे. त्यासाठी रा. ग. जाधव यांच्या मते, "ललित साहित्यातील भावमूल्याचे हे अग्रस्थान माणसांच्या मानसव्यवहारानेच सिद्ध केलेले आहे. ललित साहित्यात म्हणूनच भावघटकाला सार्वत्रिक वाव नसला तरी सर्वाधिक मान मात्र आहे."[४] भावना व विचार यात तत्वतः फरक असला तरी ललित साहित्यात येणाऱ्या भावनांचे व विचारांचे रूपांतर घडते मग त्यातील विचारदर्शन हेही भावनात्मक म्हणून भावमूल्य प्राप्त झालेले असू शकते. उलट मूळच्या भावनेचे ललित वाङ्मयात विचारात्मक रूपांतर होऊ शकते मग त्यातील भावमूल्य लुप्तच होते.

**ललित साहित्यातून लेखकाच्या भावना आविष्कृत होत असतात :-**

दुर्गा भागवत लिहितात, "कवितेप्रमाणे ललित लेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते."[५] ललित साहित्य आणि त्याचा निर्माता यांचे एक अतूट असे नाते असते. लेखक किंवा कवी हा आपल्या साहित्यात कुठे ना कुठे तरी गुंतलेला आढळतो आपल्या साहित्यातून आपले विचार आणि आपल्याला आलेले अनुभव आविष्कृत करत असल्याने साहित्यात त्याच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब उमटणे अपरिहार्य ठरते. लेखक किवा कवी स्वतला स्वतःच्या लेखनापासून अलिप्त ठेवूच शकत नाही म्हणूनच एखाद्याच्या लेखनावरुन त्या लेखकाचे आचार, विचार, त्याची संस्कृती, त्याचे अनुभवविश्व, त्याचा सामाजिक स्तर सहजपणे लक्षात येतो. ललित साहित्यातून लेखकाच्या मनाचे प्रतिबिंब उमटत असते कारण त्याच्या मनाचाच तो आविष्कार असतो.

**नवनिर्मिती हे ललित साहित्याचे प्रधान वैशिष्ट्य आहे :-**

लेखक मधु कुलकर्णी यांच्या मते, "कोणत्याही वस्तूला कलाकृती म्हणत असताना ती सौंदर्य निर्माण करणारी मुळात 'नवनिर्मिती' असली पाहिजे."[६] याचाच अर्थ ललित साहित्यात नवनिर्मितीत आवश्यकता आहे. त्यासाठी लेखक वामन लेले यांनीही त्यांचे स्वतःचे मत मांडलेले आहे, त्यांच्या मते, "ललित लेखक एक मनुष्य या नात्याने जरी इतर मनुष्यासारखाच असला तरी त्याची संवेदनशीलता इतरांच्या मानाने तीव्रतर असल्यामुळे त्याला नित्य नवीन अनुभूती असतात."[७] प्रत्येक लेखकाची /कवीची निर्मिती ही त्याच्या कल्पनेने निर्माण केलेली एक स्वतंत्र निर्मितीच असते. आपल्याला आलेला अनुभव तो

शब्दातून व्यक्त करत असतो. लेखकाच्या व्यक्तिमनाने निर्मिलेले अंतर्बाह्य सुसंगत असे ते एक चित्रच असते. आपल्या कल्पनाशक्तीच्या सहाय्याने अनुभवाची एक अभिनव सृष्टी ते निर्माण करतात. उदाहरणादाखल कोणतीही कथा, कविता किंवा कादंबरी ही विशिष्ट लेखकाची कवीची त्यावेळची नवनिर्मितीच असते. बालकवींची 'फुलराणी' ही कविता त्या विशिष्ट वेळच्या अनुभवाची शब्दसहाय्याने आविष्कृत झालेली आहे. ती कविता पुन्हा लिहावे म्हटले तरी शक्यच नाही. त्यातील शब्दाची अदलाबदल करणेही शक्य होत नाही, शास्त्र साहित्यात किंवा प्रचार साहित्यात वारंवार बदल होऊ शकतात. परंतु ललित साहित्यात मात्र नवनिर्मितीच्या सिद्धांतामुळे त्यातील शब्द व शब्दाचा क्रम बदलता येत नाही. लेखकाच्या त्यावेळच्या मनाची ती अवस्था असते.

## ललित साहित्य हे भाषेच्या शब्दाच्या सहाय्याने आविष्कृत होत असते :–

वामन लेले यांच्या मते "ललितसाहित्य भाषेवर अवलंबून असते, भाषा ही संबद्ध समाजाच्या एकूण संस्कृतीच्या स्वभावात मुरलेली असते. त्यामुळे ललितसाहित्यातील भाषाशैलीचा विचार इतर प्रयोगांच्या संबंधात करावा लागतो."[८] भाषा आणि भाषेतील शब्द हेच साहित्याचे माध्यम असते. त्यांचा आधार घेऊनच साहित्य अवतरते. त्याशिवाय जर ते अवतरले असते तर त्याचा इतर कलेमध्ये समावेश करावा लागला असता, कारण इतर कलेमध्ये इंद्रियाद्वारे प्रत्यक्ष आनंद उपभोगता येतो कलाकाराला जे सांगायचे आहे ते तो शब्दाशिवाय सांगत असतो. उदा. चित्रकलेत, शिल्पकलेत, संगीत कलेत, शब्दाची आवश्यकता मुळीच नसते. संवेदनांचा प्रत्यक्ष अनुभव चित्रकार रंगवून देतो तर गायक आपल्या स्वरातून देतो. लेखक/कवी हाच अनुभव मात्र प्रत्यक्ष देऊ शकत नाही. शब्दांचा तो साधन म्हणून वापर करतो व तो वाचकांच्या कल्पनाशक्तीवर सोडून देतो म्हणूनच इतर कलांना 'भाषा' जाणण्याची गरज नसते. परंतु साहित्यामध्ये भाषेची आवश्यकता असते. थोडक्यात भाषेच्या माध्यमातूनच ललित साहित्य हे आविष्कृत होत असते.

## ललित साहित्य हे शैलीने नटविले जाते :–

लेखक वामन लेले यांच्या मते, "ललित लेखनाची शैली हे भाषाप्रयोगाचे एक अनन्य व अनेक घटकोपघटकांच्या पारस्पारिक क्रियाप्रतिक्रियांमधून जन्माला आलेले रूप असते."[९] ललित लेखकाच्या संबंधात लेखक हा सर्वात महत्वाचा घटक होय. तोच

खऱ्या अर्थाने कर्तासवरता असतो. त्याच्या व्यक्तिमत्वाच्या मुशीतून ललित लेखन साकार झालेले असते. त्यामुळे त्याची छाप लेखनाच्या अंगप्रत्यंगावर उमटलेली असते. ती शैलीवर स्वाभाविकपणे व अपरिहार्यपणे अवलंबून असते. भाषेच्या सुयोग्य रूपाची निवड म्हणजे शैली, ही ललित साहित्यात वारंवार आढळते. साहित्याचा पोशाख म्हणजे शैली. प्रत्येक साहित्यिक स्वतःची अशी एक विशिष्ट शैली निर्माण करीत असतो. साहित्यकृतीतील अलंकार योजना, लयबद्धता आणि लेखन प्रभावी करण्यासाठी योजिलेल्या इतर क्लृप्त्या यांचा विचारशैलीत समाविष्ट होतो. शीर्षकापासून परिच्छेद रचनेपर्यंत साऱ्या गोष्टी शैलीत अंतर्भूत होतात. त्यामुळे ललित साहित्यातही शैलीला महत्व असते.

## ललित साहित्यातील प्रत्येक कलाकृती स्वयंपूर्ण असते :-

याबद्दल रा. ग. जाधव यांचे मत असे आहे की, "ललित साहित्य ही एक स्वयंपूर्ण मूल्यकल्पनाच आहे."[१०] त्यानंतर वामन लेले म्हणतात, "ललित साहित्यही आपली स्वतःची परंपरा, वारसा निर्माण करीत असते."[११] ललित साहित्यातील प्रत्येक कलाकृतीचा स्वतःचा असा एक आकृतीबंध असतो. अन् ही क्रिया नैसर्गिक असते. प्रत्येक कलाकृतीतून एक संपूर्ण चित्र साकार होत असते. त्यातील सौंदर्य अनुभवण्यासाठी आणखी कोणत्याही साधनांची आवश्यकता भासत नाही. मूलतः त्यात एक विशिष्ट प्रकारचा सुसंघटितपणा असतो. थोडक्यात, अपूर्ण अर्धवट, परावलंबी या गोष्टी ललित साहित्यात कधीच नसतात संपूर्णता व स्वयंपूर्णता हेच त्याचे वाङ्मयनिष्ठ वैशिष्ट्य आहे.

## ललित साहित्यामध्ये लालित्य असते :-

साहित्यातील सौंदर्य हेच ललित साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण असल्याने त्याचा विचार या संदर्भात होणे गरजेचे आहे. काव्यातील सौंदर्यतेचा विचार करूनच पूर्वी 'साहित्य म्हणजे काव्य' असे समजले जात होते. तसेच अशा साहित्यात सौंदर्य असल्यानेच शास्त्रीय साहित्यापासून ललित साहित्य वेगळे ठरते. 'एखाद्या व्यक्तीला 'तू' अमूक एक भूगोलाचे पुस्तक वाच' म्हणून आपण जेव्हा सांगतो. त्यावेळी त्या भूगोलाच्या पुस्तकातील माहिती वाच असे आपणाला सांगायचे असते. पण जेव्हा आपण तू एखादी कथा, कादंबरी अगर कविता 'वाच' म्हणून सांगतो त्यावेळी त्यातील सौंदर्याचा अनुभव घे असे सांगायचे असते. यावरून ललित साहित्यातील ललित, म्हणजे सौंदर्य असणे किती अनिवार्य ठरते हे आपल्या लक्षात येते.

## ललित साहित्यातून जीवनाचे दर्शन घडते :–

व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांच्यातील सुख–दुःखाचा, हर्ष खेदाचा, चांगल्या वाईटाचा वेध घेण्याचा प्रयत्न लेखक/कवी करत असतो त्यातून जीवनानुभूती घडत असते. त्यामुळेच आपणाला ललित साहित्याचा कंटाळा येत नाही. आपण एखादी ललितकृती पुन्हा पुन्हा वाचतो. उदा:– हरिभाऊंच्या कादंबऱ्या, गडकरी–खाडीलकरांची नाटके ही आजही एक वेगळाच आनंद देतात. कारण तात्कालीन जीवनाचे दर्शन घडविण्याची ताकद त्यांच्या साहित्यात आहे. म्हणूनच काळ बदलला तरी त्यातील आनंद देण्याची क्षमता तितकीच आहे. याउलट टेलिफोन नंबर बदलले की टेलिफोन डिरेक्टरी म्हणजे रद्दीच होय. पण 'ललित साहित्य हे अमर असते.' कारण त्यातून जीवनाचे दर्शन घडते.

## 2. ललित साहित्यातून घडणारे निसर्गचित्रण :–

ललित साहित्याचा जसजसा विकास होत गेला तसतसे नवनवीन प्रकारचे लेखन या ललित साहित्यात होऊ लागले. परंतु साहित्यामध्ये निसर्गाचे चित्रण हे फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. मारुती चितमपल्ली म्हणतात, "निसर्ग आणि माणूस वेगळा नाही."[१२] त्याप्रमाणे माणूस लेखन करतोय म्हटल्यानंतर त्यामध्ये निसर्गाचा उल्लेख येणारच। परंतु ललित लेखकांनी आपल्या साहित्यामध्ये सौंदर्यात्मक दृष्टीने निसर्गाचे चित्रण केलेले दिसते. ललित साहित्यातून घडणारे निसर्गचित्रण मनास भावते. श्रीनिवास कुलकर्णी यांनी 'डोह' या ललित पुस्तकामध्ये बरेचसे निसर्गाचे वर्णन आणि निसर्गाचा उल्लेख केल्याचे दिसून येते. 'मनातल्या उन्हात' हा त्यांचा लेख सुंदर पद्धतीने रेखाटला आहे. या लेखातील निसर्ग वर्णन "उन्हे यायची, सावकाश, ती काही लवकर उठायची नाहीत. हळूहळू उतरत यायची. पण एकदा येऊनउतरली की, मग झटकन पंख झाडायची नि उंच होत जायची उगवतीच्या दारातनं तांबूस हिरव्या मळ्यांना जागे करीत. डोहाला गुदगुदल्या करीत अलीकडच्या आळशी डगरीला भेडसावित देवळाच्या कळसाला आल्याचे कळवित."[१३] लेखक श्रीनिवास कुलकर्णी यांनी बालपणापासून मनात दाटून राहिलेल्या आठवणींना साहित्याद्वारे व लेखनाद्वारे उजाळा दिला. बालपणी पाहिलेल्या निसर्गाचेच त्यांनी सुंदर असे वर्णन केलेले आहे.

त्यानंतर दुर्गा भागवत यांच्या साहित्यात निसर्ग चित्रण आलेले आहे, दुर्गा भागवत म्हणतात, "एकूण एक मानव प्राणी हा निसर्गाचाच एक स्वतंत्र व्यक्तिमत्व घडविण्यासाठी झटणारा प्राणी विशेष आहे."[१४] दुर्गा भागवत निसर्ग आणि मानवाला एकमेकांपासून वेगळं करीत नाहीत. त्यांच्या ललित लेखनात प्रामुख्याने ललित लेख, प्रवास, व्यक्तिरेखा, आठवणी, लघुनिबंध हे प्रकार विशेष दिसत असले तरी त्यामधूनही त्यांनी निसर्गाचे थोडेफार चित्रण केलेलेच आहे. त्या निसर्गाबद्दल जेव्हा दुसऱ्याला सांगतात त्यावेळी त्यांनी स्वतःलाही निसर्गातच सामावून घेतलेले दिसते. दुर्गा भागवत लिहितात, " 'मी' – माझा देह, माझ्या भावना, माझे जीवन यांच्यात मीही निसर्गाचाच एक चेतन भाग आहे. हे विशेषत्वाने जाणवू लागले आहे. जगात, जीवनात निसर्गाशिवाय काहीच नाही. मरण देखील निसर्गच आहे."[१५] यावरून निसर्गाबद्दल दुर्गाबाईंच्या मनात भरपूर जिव्हाळा असल्याचे दिसून येते. 'ऊन पाऊस' या लेखातसुद्धा त्यांनी बरचसे निसर्गचित्रण केलेले आहे. 'मेघश्याम आषाढ' या लेखात दुर्गा भागवत लिहितात, "वैशाखा अखेर सुटणाऱ्या स्वैर वाऱ्याच्या झुळका उन्मत्त झाल्या. झाडांच्या फांद्यांना गदगदा हलवू लागल्या. वसंतातल्या नाजूक सौम्य लहरींचे परिवर्तन लहान लहान वावटळीत झाले. झाडांची सुकी पाने भराभर गळून पडू लागली आणि ठिकठिकाणी वाऱ्याच्या भोवऱ्यात धुरळ्याबरोबर गिरक्या घेत नाचू लागली."[१६] दुर्गा भागवतांचे 'निसर्गोत्सव' हे पुस्तक निसर्ग साहित्यात मोडते त्यामुळे त्याच्या काही लेखातील वर्णने इथे दिलेली आहेत. 'डोंगरमाथ्यावर' या लेखात दुर्गा भागवत यांनी केलेले एका निसर्गदृश्याचे वर्णन डोळ्यात भरते, "भर दिवसा सारे जग जणू झोपले आहे. व्यवहाराची वस्त्रे दूर फेकून देऊन नग्न होऊन झोपले आहे. ऊन डोळे वटारून वटारून त्याच्याकडे पाहाते आहे. वारा वरच्यावरच वाहतो आहे."[१७] या निसर्ग वर्णनावरून असे दिसून येते की, दुर्गाबाईंनी स्वतः सांगितल्याप्रमाणे मानव आणि निसर्गाला त्यांनी वेगळं केलं नाही. इरावती कर्वेंनी जे ललित लेखन केले त्यामध्ये निसर्गाचा उल्लेख जास्त केलेला दिसून येत नाही. त्यांच्या साहित्यातून थोडाफार निसर्गाचा उल्लेख आलेला आहे. 'जन्मांतरीची भेट' या लेखात इरावतीबाईंनी केलेले निसर्गाचे वर्णन पाहण्यासारखे आहे. "सूर्य पिवळ्या लखलखत्या सोनेरी किरणांनी सगळ्या वस्तूंना मुलामा चढवीत होता. ह्या किरणांत आल्हाददायक चमक होती पण तीव्रता नव्हती. आता सगळीकडे शुद्ध बावनकशी सोन्याच्या रंगात झाडांचे शेंडे, घरांची छपरे, शेते रंगून निघाली होती. समोरच्या तळ्यावर वाऱ्याच्या झुळकीसरशी

सोन्याच्या लहरी पसरत होत्या. हळूहळू या शुद्ध सोन्याला लाली चढू लागली."[१८] यावरून असे प्रत्ययास येते की, इरावती कर्वे यांच्या लेखनात ठराविकच पण सुंदर असा निसर्गाचा उल्लेख आलेला आहे.

त्यानंतर 'आहे आणि नाही' या शिरवाडकरांच्या पुस्तकामध्येही बरेचसे निसर्ग चित्रण आलेले आहे. 'श्रीयुत आकाश' या लेखात ते वर्णितात, "सूर्यास्ताच्या वेळी क्षितीजावर चाललेला रंगविलास पाहता, भव्य सौंदर्याची ती झगझगीत पेठ पाहून पाहणाऱ्याचे डोळे दिपून जातात. क्षितिजावर इतस्ततः पसरलेल्या मखमली मेघांवर सोनेरी, कुसुंबी, केशरी व जांभळ्या रंगाचे देदीप्यमान झोत एकामागून एक असे पडत असतात. ते दृश्य पाहून पश्चिमेचं क्षितिज म्हणजे ग्रहताऱ्यांच्या जगातील रंगभूमीच असावी. अशी कल्पना मनात येते. पाहता पाहता पडद्याची मखमल बाजूला ओढली जाते आणि शुक्राची चांदणी एखाद्या लावण्यवान अभिसारिकेप्रमाणे मोठ्या डौलाने रंगमंचावर प्रवेश करते."[१९] प्रत्येक लेखकाने विविधतेने निसर्गाचे आणि निसर्गाच्या घटकांचे वर्णन केलेले आहे. त्यातून त्याची प्रतिभा, सौंदर्यदृष्टी, लेखनशैली, निसर्गप्रेम इत्यादींचे दर्शन घडते. मारुती चितमपल्ली सुद्धा असेच एक संवेदनशील निसर्गप्रेमी लेखक आहेत. त्यांच्या या निसर्ग वर्णनाचा आपणास अभ्यास करायचा आहे त्यासाठी निसर्गाचे आपण वैशिष्ट्ये पाहणार आहोत.

मारुती चितमपल्ली यांनी केलेले निसर्गाचे चित्रण अत्यंत विलोभनीय आहे. मराठी साहित्याच्या दालनात त्यांनी निसर्ग लेखन करून मोलाची भर घातलेली आहे. चितमपल्लींनी आपले सारे आयुष्यच निसर्गाच्या सान्निध्यात आणि त्यांचे रक्षण करण्यात घालविले. त्यामुळे तर त्यांच्या साहित्यात पानापानावर निसर्ग अवतरलेला दिसतो. चितमपल्लींनी एवढे सुंदर निसर्गाचे वर्णन केलेले आहे की, त्यांचे लेखन वाचताना आपल्या मनातही सगळीकडे हिरवेगार वातावरण निर्माण होते. त्यांच्या स्वतःच्या मनातली हिरवळ तर कधी संपतच नाही. सजीव असा निसर्ग दाखविल्याने त्यांचे निसर्गचित्रण मग अधिकच आवडू लागते. त्यांनी लिहिलेल्या जवळजवळ १९ पुस्तकांपैकी सर्वच पुस्तकांमध्ये निसर्गाचे चित्रण केलेले आहे. 'जंगल आणि पठार' या लेखात चितमपल्लींनी केलेले निसर्गाचे वर्णन मनाला भावते, "निळं पाणी नदीकाठची हिरवी कुरणं. अन् त्या पल्याडल्या डोंगराच्या रांगा. वरील झिलानीवरील कानी येणारा टिटवीचा विभ्रान्त स्वर, त्या आर्द्र विरळ वातावरणातून आता

दूरचंही स्पष्ट दिसू लागलयं, उन्हाळ्यातल्या ढगांच्या सावल्यादेखील दिसत नाहीत. कस एखाद्या हवा प्यालेल्या वारूसारखं वाटतंय. मुक्त आणि आनंदी"[२०] निसर्गाच्या सान्निध्यात चितमपल्ली नेहमीच आनंदी राहतात. तो गुण त्यांनी निसर्गाकडून घेतलेला आहे त्यासाठी चितमपल्ली लिहितात, "वसंत ऋतूत पहाटेपूर्वी फिरायला जाणं अत्यंत आनंदाच असतं. उतारावरून बांधाकडे जात असताना धुकं तळ्यातून हळूहळू वर येत असलेलं दिसतं. गार वारा अंगाला झोंबतो. कोटच्या कॉलरनं मी कान झाकतो. कुठल्यातरी अनामिक आनंदाच्या बेहोषीत मी असतो."[२१] यावरून असे दिसून येते की, चितमपल्लींना निसर्ग सान्निध्यात खूप आनंद होतो. हाच आनंद त्यांच्या साहित्यात उतरलेला दिसतो. आणखी एके ठिकाणी चितमपल्लींनी केलेले निसर्ग वर्णन मनाला भावते, "शरद ऋतूला नुकतीच सुरूवात झालेली जिकडे पहावे तिकडे हिरवीगार, सुस्नात वनश्रीवर निरभ्र निळे आकाश हवीशी वाटणारी उन्हे. चोहोकडे निसर्गाचे संगीत चालू असे."[२२]

या वर्णनावरून असे दिसून येते की, चितमपल्लींनी निसर्गाचे वर्णन करताना फक्त निसर्ग, जंगल झाडेझुडपे एवढेच लक्षात घेतले नाही तर, निसर्गातील प्रत्येक घटकाचा बारकाव्याने विचार केला. निसर्ग ज्याने गजबजून जातो त्या पशुपक्ष्यांच्या आवाजाचासुद्धा उल्लेख त्यांच्या निसर्ग चित्रणात येतो. चितमपल्ली लिहितात, "जंगलात पळसाला फुलांचा बहर आला, की मधाच्या लोभापायी शेकडो, लक्षावधी पळसमैना स्थलांतर करून इथं आलेल्या असतात. त्याच्या किलबिलाटानं सारं जंगल व्यापून जातं."[२३] चितमपल्लींनी निसर्गाचे वर्णन करताना प्राचीन ऋषीमुनींना सांगितलेले निसर्गाचे वर्णन तसेच संतांनीही सांगितलेल्या निसर्गाच्या महात्म्याचा उल्लेख आपल्या साहित्यात संदर्भ म्हणून केलेला आहे. उदा. :—दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो ।। समर्थ रामदास नेहमी डोंगरात राहत नित्य नूतन प्रदेशात फिरत. चितमपल्ली म्हणतात. "जंगलातील वास्तव्यात, दऱ्याखोऱ्यात फिरताना मी समर्थांच्या शिकवणुकीचे पालन केल्यामुळेच मला निसर्ग लेखक आणि पक्षीनिरीक्षक होता आले."[२४] वरील विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, चितमपल्लींनी आपल्या लेखनात निसर्गाचे मूर्तिमंत दर्शन घडविण्याचा प्रयास केलेला आहे. त्यांचे निसर्गवर्णन अप्रतिम असे उतरले आहे. त्यामुळेच ते वाचकांना मनापासून आवडते. एक निसर्गप्रेमी लेखक म्हणून मारुती चितमपल्लींची प्रतिमा वाचकांच्या अंतर्मनावर ठसते हेच त्यांचे खास

वैशिष्ट्य होय. त्यांच्या लेखनातून वन्यप्राणीदर्शन व पशूपक्षीवर्णन किती हुबेहूब घडते याचा विचार आता करावयाचा आहे.

### 3. वन्यप्राणी दर्शन आणि पशूपक्षी वर्णन :–

ललित साहित्यामध्ये मानवाप्रमाणेच निसर्ग आणि प्राण्यांचेही दर्शन घडते. वन्यप्राण्यांबरोबर निसर्गात वावरणाऱ्या पशुपक्ष्यांचेही वर्णन ललित साहित्यात आढळते. ललित साहित्यिकांमध्ये अनेकजणांनी आपल्या साहित्य लेखानात प्राणी निसर्ग, पशूपक्ष्यांचा उल्लेख केलेला आहे परंतु त्याचबरोबर त्यांनी जीवनातील सुखदुःखावर आणि जीवनातील घडामोडींवर जास्त लेखन केले त्यामुळे त्यांच्या लेखनात पशूपक्षी आणि प्राणीमात्रांचा उल्लेख अल्प प्रमाणात असल्याचे दिसून येते. 'इरावती कर्वे' यांच्या लेखनात आलेले पक्ष्यांचे वर्णन असे आहे की, "माझ्या उत्सुक कानांना सारस पक्ष्यांचा कर्कश पण आर्त स्वर ऐकू आला व बंगल्यापुढून एक जोडी तळ्याच्या दिशेने गेली. किती खाली उडत होती ती! त्यांचे लांब राखी निळसर पंख ताणून पसरले होते. दोन अडीच फुट लांब पाय मागे लांबवले होते. तितकीच लांब गोल मान पुढे लांब चोचीच्या टोकाशी निमुळती झाली होती मधूनच ते 'कर्र क्रे' असे ओरडायचे व आपल्या जड लांब पखांची खालीवर हालचाल करायचे. 'विमान चाललयं जणू !"[२५] इरावतीबाई समाजशास्त्रज्ञ असल्या तरीही त्याना पशुपक्ष्यांविषयी जिव्हाळा आहे निसर्गाबद्दल प्रेम आहे. त्यांच्या ललित लेखनात याचा उल्लेख आलेला आहे. इरावती कर्वे यांच्या ललित साहित्य लेखनात थोडेसेच पण सुंदर असे पक्षी वर्णन आढळते.

वि. वा. शिरवाडकर यांच्या 'आहे आणि नाही' या लघुनिबंधसंग्रहामध्ये वन्यप्राणी दर्शन आले आहे. आंतरीक जिव्हाळ्याने शिरवाडकरांनी प्राणी दर्शन घडविले आहे, "गरुड हा कोकिळेप्रमाणे मोहरलेल्या आम्रावर बसून कूजन करणार नाही. पोपटाप्रमाणे पिंजऱ्यात तुमच्या शब्दांचा प्रतिध्वनी काढणार नाही. परंतु या गोष्टी तो करीत नाही म्हणूनच तो श्रेष्ठ आहे. त्याचे वैशिष्ट्य कंठाच्या माधुरीत नाही अथवा पिसाऱ्याच्या रंगामध्ये नाही तर ते त्यांच्या आंतरिक आणि शारीरिक सामर्थ्यात आहे."[२६] कधीही घरकुल न बांधता गुहेमध्ये राहणाऱ्या या गरुडाचा पिंजरा म्हणजे आकाश आणि क्षितिज आहे. गरुड

हा विरुप दिसणारा पक्षी पण तो साहित्यात खूप उठून दिसतो. गरुड सुंदर नाही परतु शिरवाडकरांनी त्याचे सुंदर असे वर्णन केले आणि त्याला साहित्यात आणले. 'मांजर' या प्राण्याचाही त्यांच्या लेखनात उल्लेख आलेला आहे. मांजराबद्दल लेखकाला फारसे प्रेम वाटत नाही. परंतु मांजराची ती चिमुकली पिलेच लेखकाला आकर्षित करतात. शिरवाडकरांनीही प्राणी, पक्ष्यांची सुंदर वर्णने ललित लेखनात केलेली आहेत. लेखक 'श्रीनिवास कुलकर्णी' यांनी 'डोह' या ग्रंथामध्ये वानर, माकड, घुबड, वाघुळ अशा प्राण्यांचे दर्शन आपल्याला घडविलेले आहे. त्यांनी केलेले प्राणीवर्णन हे पाहण्यासरखे आहे. "देशपांड्यांच्या घराच्या भिंतीला लागून देवघराची मोठीच्या मोठी गच्छी दिसे तिच्यावर वानरांच्या खूप बाया जमत. एकमेकींच्या पुढे पाय करुन उवा मारीत. पुढे येऊन बसलेली हलली तर तिला थापड बसे." एखादीला नुसते पोर झालेले असे दुधाच्या तापाने ती मलूल झालेली दिसे. या साऱ्या काळतोंड्या बायात त्या पोराचे त्या बाया माणसांच्या आयांइतके कौतुक करीत."[२७] यावरून असे दिसून येते की, माणसाप्रमाणे प्राण्यांनाही भावभावना असतात, क्षणिक का होईना पण प्राणी आपल्या पिलांवर मायेची पाखर घालतात. त्यानंतर त्यांनी पाण्यातील मासे, सुसर इ. प्राण्यांचेही दर्शन या पुस्तकातून घडविले आहे. असे ललित लेखकांच्या लेखनात वन्यप्राणी दर्शन पशुपक्षी वर्णन आलेले आहे. परंतु चितमपल्लींनी मात्र वन्यप्राण्यांचे संशोधक वृत्तीने निरीक्षण केले, अभ्यास केला आणि त्यातून त्यांना वन्यप्राणी जीवनाचा जो अनुभव आला त्याचा उल्लेख साहित्यात केला असल्याचे दिसून येते.

## मारुती चितमपल्ली यांच्या ललित साहित्यामधून घडणारे वन्यप्राणी दर्शन :–

चितमपल्लींच्या साहित्यात वाघ, हत्ती, अस्वल, तणसांबर, खवल्या मांजर, रानम्हशी, नाग, घोरपड, सिंह, खोकड, रानकुत्रा, कोल्हा, वानर हे प्राणी आणि कावळे, चातक, चक्रवाक, पोपट, मैना, भोरड्या, कबूतर, चिमण्या, बगळे, ढोकरी, पाणकावळे, ककर, चामढोक, देवपक्षी, चंदनपक्षी, धनेशपक्षी इ. पक्षांचा उल्लेख आढळतो चितमपल्लींनी पशू, पक्षी व प्राणी यांचा फक्त उल्लेखच केला आहे असे नाही तर चितमपल्लींनी त्यांचे सूक्ष्म निरीक्षण केले आणि त्यावरून त्यांच्या प्रत्येक हालचालींचे वर्णन केले त्यांच्या जगण्याची पद्धती वर्णिलेली आहे त्यांच्याबद्दलचे कवी सकेत दिलेले आहेत. त्यांच्याबद्दल इतर साहित्यातील संदर्भ दिलेले आहेत. प्राचीन साहित्यिकांनी दिलेले दाखले, संतांनी सांगितलेली माहिती,

संस्कृतमध्ये आलेले पक्षीप्राण्यांविषयी ज्ञान, आपल्या पूर्वजांनी सांगितलेली माहिती, प्राणी पक्ष्यांच्या घरट्याचे वर्णन, त्यांचा निसर्गाशी असलेल्या नातेसंबंधाचा उल्लेख केलेला आहे. चितमपल्लींनी प्राणी पक्ष्यांविषयी संशोधनही केले. चितमपल्लींच्या साहित्य वाचनातून असे जाणवते की, सर्वसामान्यांच्या पाहण्यात नसणारे दुर्मिळ असे प्रसंग टिपलेले आहेत. उदाः– नीलगाय कासवाला खाते. कासव झाडावर चढते. चितमपल्लींनी स्वतः सांगितले आहे की, कासवाविषयीच्या शास्त्रीय ग्रंथात या दुर्मिळ नोंदी आढळून येत नाहीत. चितमपल्लींनी मात्र जाणीवपूर्वक याची नोंद घेतलेली आहे.

चितमपल्लींनी मानव आणि प्राण्यांच्या भावनांचा ताळमेळ घातलेला आहे. उदाः– सुवर्णगरूड पुस्तकामध्ये त्यांच्या प्राण्याविषयीच्या बऱ्याच कथा म्हणजे नकुल, मनोली : एक पाडस, एनाक्षिमिया आणि वाघीण, फेरु परत आला नाही. असे लेख खरोखरच लेखकांनी सहृदयतेने लिहिलेले दिसतात. 'एनाक्षिमिया आणि वाघीण' या लेखात काही माणसंही चांगली असतात तर काही प्राण्यांकडूनही नकळत चुका होतात हे दाखवून दिले आहे. एनाक्षिमिया एका अनोळखी माणसासाठी स्वतःचे प्राण घालवतो तर वाघीणीला जेव्हा हे कळते की, आपल्याला आधार दिलेल्या माणसाला आपणच मारले तेव्हा ती हा धक्का सहन न झाल्यामुळे जागीच आपला प्राण सोडते. यावरून त्या वाघीणीच्या मनातले हळवे भाव दिसून येतात.

त्यांच्या लेखनात पक्षी प्राणी यांच्या आवाजाचाही उल्लेख आलेला आहे. 'आवाजाचा रंग' या लेखात ते लिहितात की, " वसंतात पाखरांची गाणी, उन्हाळ्यात जंगलातील रातकिड्यांची किरकिर, हिवाळ्यात हिमवर्षाची भुरभूर, चांदण्यात मुरलीचा सुस्वर आवाज, पर्वतातील देवदार वृक्षांची रुणझुण आणि तळ्याकाठी पाण्यातील आंदुळणाऱ्या लाटांचा 'चुबुक चुबुक' आवाज ऐकण्यासारखा असतो आणि हे ऐकणारा मनुष्यच जीवन रसिकतेने जगू शकतो."[२८] आणखी काही प्राण्यांच्या आवाजाचा उल्लेख त्यांच्या लेखनात आला आहे.

उदा :– वानर – खॅक खॅक खिकीट, खॅक खॅक

मोर – को ऽ, को ऽऽ को ऽऽ

सांबराची मादी – कॅक् ऽ कॅक् ऽऽ

नर ढोक – कोंक ऽऽ कोंक ऽऽ

अशाप्रकारे चितमपल्लींनी वाचकाला प्रत्येक प्राण्यांच्या आवाजाची त्यांच्या स्वरांचीही ओळख करून दिलेली आहे.

प्राचीन साहित्यातील संदर्भामुळे चितमपल्लींच्या लेखनाला उठावदारपणा येतो. उदा:–संताच्या साहित्यातही चातकांचे उल्लेख येतात. चकोर चांदण्यासाठी झुरतो, चकोरी चांदणे पिऊन मस्त झाली आहे, इत्यादी उल्लेख प्राचीन संस्कृत ग्रंथात सापडतात. "चकोरीची पिले' तिच्याबरोबर शरद ऋतूत जंगलात चरत हिंडत फिरत असतात. ज्ञानेश्वरांनी त्यांचे सुंदर वर्णन केले आहे.

जैसे शारदियेचिये चंद्रकळे । माझि अमृतकण कोवळे।

ते वेंचिति मने मौआळे। चकोरतलगे। (ज्ञा.-।। ५६।।)" [२९]

चितमपल्लींनी आपल्या लेखनात प्राणीवर्णन करताना प्राचीन साहित्यात प्राण्यांविषयीचे जे संकेत, जी माहिती आलेली आहे, त्याचीही नोंद केली. त्यांनी स्वतः प्राचीन साहित्याचा अभ्यास केला आणि आपल्यालाही त्याची आळख करून दिली. त्यामुळे प्राण्याविषयी वाचकांच्या मनात जास्त जिव्हाळा निर्माण होतो.

त्यानंतर 'कोल्हा' या लेखात चितमपल्ली म्हणतात, "शेतीच्या वापरात येणाऱ्या कीटकनाशक द्रव्यामुळेही कोल्ह्यांची संख्या घटत आहे. शेतातील पिकाना विषारी द्रव्याचे फवारे मारल्यामुळे त्याचे भक्ष्य असलेले प्राणी मृतप्राय होतात असे प्राणी खाऊन कोल्हेही प्राणास मुकतात."[३०] चितमपल्लींनी पक्षी, प्राणी यांची फक्त वर्णने केली नाहीत तर त्यांच्या जाती तयार नष्ट कशा होतात हे सांगून त्यावर उपाय सांगितलेले आहेत. त्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीनेही चितमपल्लींचे लेखन उपयुक्त ठरते. याशिवाय चितमपल्लींनी वाचकालाही

पर्यावरणाविषयी जागृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'सूक्ष्म निरीक्षण शक्तीने, संशोधक वृत्तीने, तीव्र संवेदनशील मनाने आणि चिंतनशीलतेने लेखन केले, असे हे लेखन करून चितमपल्लींनी मराठी साहित्याच्या दालनात मोलाची भर घातलेली आहे.

## ४ इतर ललित साहित्यिक आणि चितमपल्लीः–

चितमपल्लींनी लेखनाला सुरुवात करण्याअगोदर अनेक लेखकांनी ललित साहित्य लेखन केलेले आहे. परंतु इतर ललित लेखक आणि मारुती चितमपल्ली याच्या लेखनामध्ये बरचसे वेगळेपण दिसून येते. चितमपल्लींनी 'जंगल' हा विषय साहित्यात आणला. चितमपल्लींनी जंगलात आढळणाऱ्या पशू–पक्षी, प्राणी आणि निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण केले. 'चितमपल्ली लिहितात की, "खरे म्हणजे ग्रंथरूपाने साहित्याची निर्मिती झाली ती पहिल्यांदा कोकणात. कवींनी व लेखकांनी तिथल्या निसर्गाची अलंकारीक वर्णने केलेली आहेत. मात्र सागर आणि सागरकिनाऱ्यावरील पाखरे त्यांना अपरिचितच राहिली. "[३१] चितमपल्लींची वृत्तीही संशोधक असल्याने त्यांनी सर्व पशुपक्षी प्राण्यांचा अभ्यास करुन त्याचा उल्लेख साहित्यात केला आहे.

## ललित साहित्यिक :–

**इरावती कर्वे** :– इरावतीबाईंचे तीनच लघुनिबंध उपलब्ध आहेत. इरावतीबाईंनी व्यक्त केलेले अनुभव प्रत्यक्षात भोगले असल्याचा प्रत्यय पदोपदी येतो. हा प्रत्यय प्रत्यक्ष लेखन वाचताना येतो. हे अनुभव एखाद्या प्रवास लेखनात शोभून दिसावेत असे आहेत. त्यामुळे त्यांना एक विशेष स्वरूपाची कांती लाभलेली आहे. त्या स्वतः समाजशास्त्रज्ञ असल्यामुळे या अनुभवांना समाजशास्त्राचे एक व्यापक परिमाण लाभलेले आहे. इरावतीबाई या एक संसारी स्त्री आहेत. संसारातील आणि समाजातील सर्व दुःखाचा स्पर्श त्या वाचकांना घडवून देतात. पाश्चात्य जीवनात त्या वावरलेल्या आहेत. त्यामुळे एका बाजूने संसारी स्त्री आणि दुसऱ्या बाजूने त्या समाजशास्त्रज्ञ आहे. नरहर कुरुंदकर म्हणतात, "इरावतीबाईंच्या सगळ्याच लिखाणाचे स्वरूप नेहतीच निबंधासारखे असेल असे नाही. कधी तो निबंध असतो तर कधी त्या नुसत्याच आठवणी असतात. कधी प्रवासवर्णन असते, कधी त्यात निरनिराळ्या व्यक्तिरेखा असतात."[३२] यावरून असे वाटते की, इरावतीबाईंनी ललित निबंधाचा विचार जाणीवपूर्वक केलेला नाही.

15184

गो. वि. करंदीकर :— यांचे 'स्पर्शाची पालवी' व 'आकाशाचा अर्थ' असे दोन संग्रह अनुक्रमे १९७१ व १९६५ साली प्रसिद्ध झाले असले तरी करंदीकर १९४१ पासून साधारणपणे लघुनिबंधलेखन करतात. कालक्रमानुसार करंदीकरांच्या लघुनिबंधलेखनाचा अभ्यास करताना 'मी'च्या अनुभवाचा सामाजिक घटक प्रथम येतो. करंदीकरांच्या निबंधाना भावावस्था लाभलेली आहे. त्यांचे लघुनिबंध हे 'मी'च्या कोणत्या ना कोणत्या एका भाववृत्तीने नियंत्रित झालेले दिसतात. लेखिका अरुणा दुभाषी म्हणतात, "करंदीकरांनी ज्या गांभीर्याने कवितेचा विचार केला त्या गांभीर्याने लघुनिबंधाचा किंवा ललित निबंधाचा विचार केला नाही."[33] करंदीकरांनी भरपूर असे काव्य लेखन केले त्या मानाने, त्यांनी लघुनिबंध किंवा ललित निबंध लेखन फारसे केलेले दिसत नाही.

दुर्गा भागवत :— दुर्गाबाईंनी कोणत्याही साहित्य प्रकाराला शरण न जाता मुक्त असे ललित लेखन केले. एखाद्या वस्तुविषयी, घटनेविषयी 'मी'ला जसे अनुभव आले तसे त्यांनी मांडले त्यांचे लेखन हे भावनाशील आहे. दुर्गा भागवत म्हणतात, "कवितेप्रमाणे ललित लेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते किंबहुना भाववृत्ती नसेल तर सृजनाचा अंकुर उगवणारच नाही."[34] दुर्गा भागवत यांनी सारे ललित लेखन हे भाववृत्तीने केले आहे.

मंगेश पाडगावकर :— १९५६ साली मंगेश पाडगावकर यांचा 'निंबोणीच्या झाडामागे' हा लघुनिबंध संग्रह प्रसिद्ध झाला. लेखक अनिरुद्ध कुलकर्णी म्हणतात, "पाडगावकरांचे कविमनच लघुनिबंधात कार्यप्रवण झाल्याचे दिसते. निसर्गाचे साधे वर्णन करतानाही त्याच्या भाषेत अमाप प्रतिमा आलेल्या असतात. त्यांच्या लघुनिबंधात विचार, चिंतन येत असले तरी ते लोकविलक्षण किंवा अव्वल दर्जाचे वाटत नाही"[35] पाडगावकरांच्या लघुनिबंधावर, फडके, खांडेकर या दोघांच्याही लघुनिबंधाची सूक्ष्म छाया आहे पण ती सर्व लघुनिबधावर नाही.

माधव आचवल :— माधव आचवल हे वास्तु कलाशास्त्राचे तज्ज्ञ आहेत त्यामुळे 'किमया' मधील लेखांना वास्तुकला अनुषंगाने शिल्पकला व चित्रकला यांचेच समृद्ध संवेदनेच्या पातळीवर आशयविश्व लाभले आहे. आचवलांचे मन तीव्र, सूक्ष्म संवेदनशील आणि काव्यात्मक आहे. शब्दांचा वापर ते अतिशय हळुवार रीतीने, मार्मिकतेने आणि कविवृत्तीने करतात. वास्तुकलेसंबंधी स्वतःला आलेल्या अनुभवांची सौंदर्यात्मक प्रस्फुरणे

अलगदपणे शब्दगत करतात. आचवलांच्या ललित लेखांमध्ये एका लोकविलक्षण व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झालेला दिसतो.

**श्रीनिवास कुलकर्णी** :— ललितलेख व लघुनिबंध यांच्या सीमारेषा मुळातच एकमेकींना भिडलेल्या आहेत. त्यामध्येच ललितलेख व लघुनिबंध दोन्ही एकत्र होऊन 'डोह' चे लेखन झालेले दिसते. ललित लेखात विषयीभूत वस्तुच्या व्यक्तिमत्वाच्या अनुरोधाने अनुभवांची मांडणी आहे तर लघुनिबंधात 'मी' या व्यक्तिमत्वाच्या अनुरोधाने अनुभवांची मांडणी आहे. अशाप्रकारे 'डोह' मधील लेखात दोन्ही मांडण्या एकजीव झालेल्या दिसतात.

**विजय तेंडूलकर** :— ललितगद्य लेखन गतिमान सामाजिक वास्तवाला भीडू शकते त्यावर जीवन सापेक्ष भाष्य करू शकते आणि तरीही ते ललितरूप धारण करू शकते याची जाणीव तेंडूलकरांच्या ललित लेखनाने करून दिलेली आहे. समग्र शहरी जीवनातील सामाजिक आशयाचा वाङ्मयीन आविष्कार हे तेंडूलकरांचे नव्या स्वरूपाचे लघुनिबधच आहेत. तेंडूलकरांनी यामध्ये मुंबईच्या सामाजिक जीवनाचे वास्तव वर्तमान टिपलेले दिसते त्यांच्या प्रत्येक लेखांना माणुसकीचा स्पर्श झाल्याचे दिसून येते. आटोपशीर व चटकदार असे कथन त्यांनी केलेले आहे.

**आनंद यादव** :— तसे पाहिले तर आनंद यादव एक ग्रामीण लेखक आहेत. १९७० ते १९८० च्या दशकात आनंद यादव ग्रामीण अनुभवांचा आविष्कार आपल्या ललित निबंधातून करताना दिसतात. १९७८ मध्ये त्यांचा 'स्पर्शकमळे' हा ललित निबंधसंग्रह प्रसिद्ध झाला. जीवन प्रवासातील निरनिराळ्या टप्प्यांवर अगदी आठव्या—नवव्या वर्षापासून तें पंन्नाशीपर्यंतच्या काळात पुरुषाच्या जीवनात स्त्री विविध श्रृंगाररूपात कशी येऊ शकते आणि त्या विशिष्ट टप्प्यांवर त्यांचे संबंध पुरुषांच्या मनात कोणकोणत्या प्रेमांगांनी अवतरू शकतात याचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न प्रस्तुत संग्रहात केलेला आहे त्यामुळे नवसुशिक्षित नगरवासी ग्रामीण मनाची स्पंदने आनंद यादव यांच्या लेखनातून अनुभवायला मिळतात.

**मारुती चिमतपल्ली** :— चितमपल्लींच्या लेखनाचा विषय निसर्ग आणि वन्यप्राणी आहे. त्यांनी जिवंत असा निसर्ग दाखवून मानवाच्या मनात निसर्गाविषयी ओढ निर्माण केली. दुर्गा भागवत म्हणतात, "प्रथमच सांगते की, मी आज ज्या तऱ्हेचे ललित

लेखन करते तसे मी कधी करीन असे मला मी एम. ए. होईपर्यंत वाटले नव्हते, नव्हे ते माझे ध्येयही नव्हते."[३६] परंतु चितमपल्लींनी जे लेखन केले ते त्यांचे ध्येय समजून केले. चितमपल्ली म्हणतात, " माझं सारं आयुष्य जंगलात गेलेलं, वन्यजीवशास्त्र हा माझा आवडता विषय."[३७] चितमपल्लींना ललित लेखनाची भरपूर आवड आहे त्यासाठी त्यांनी इतर भाषांचाही अभ्यास केलेला आहे त्यातून त्यांनी पक्ष्यांविषयी, प्राण्याविषयी ज्ञान मिळविले आहे. आपण सर्वजण निसर्गाला आपला मित्र मानतो, कारण आपल्या पूर्वजांनी, ऋषीमुनींनी तसे आपल्याला सांगितले आहे. चितमपल्ली स्वतः तर निसर्गाशी एकरूप झालेच पण साहित्य लेखनच असे केले की, वाचकही निसर्गाचा नातेवाईक होतो. वाचता वाचताच वाचकालाही आपल्या जुन्या नातेवाईकांची ओळख पटते. दैनिक ऐक्यच्या बातमीनुसार, "मारुती चितमपल्ली यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व जवळ जवळ संपूर्णतः निसर्गाशी जोडलेले आहे. आत्तापर्यंत मराठी साहित्याला ज्या विषयाची ओळखही नाही त्या विषयाची ओळख आणि माहिती करून देण्याचे श्रेय चितमपल्ली यांचेच आहे."[३८] चितमपल्लींनी जेवढे लेखन केले ते सर्व निसर्गाविषयी आणि निसर्ग सानिध्यात राहून. मग त्यामध्ये निसर्गात वावरणाऱ्या प्राणीमात्रांचे वर्णन त्यांचा उल्लेख, त्यांचे जीवन, या सर्वाविषयी ते तळमळीने लिहितात आणि वाचकांना त्याची ओळख पटवून देण्याचा प्रयत्न करतात. प्रा रा. ग. जाधव म्हणतात, "चितमपल्ली यांनी सारे आयुष्यच या सृष्टीला वाहून घेतलेले आहे. निसर्ग हाच त्यांच्या साहित्याचा पहिला हुंकार आहे. सृष्टीला आयुष्य वाहून घेणाऱ्या या लेखकाची अभ्यासू दृष्टी या साऱ्यातून प्रतिबिंबीत होते आणि सजीवांची एक वेगळीच सृष्टी उलगडते. सजीवांच्या सृष्टीत, त्यांच्या सुखदुःखात हा लेखक इतका एकाग्रतेने समरस झाला असल्याने हे सृष्टी सौंदर्य एका वेगळ्या उंचीवर जाते."[३९] चितमपल्लीं एक वनाधिकारी असल्याने त्यांनी स्वतः तर वनांचे संरक्षण आणि संवर्धन केलेच पण आपल्या ललित साहित्यातून इतरांना वनसंरक्षणसाठी जागरूक केले. वनांचे रक्षण करणे हे चितमपल्ली आपले काम नव्हे तर कर्तव्य मानतात असे त्यांच्या ललित साहित्यावरून दिसून येते. चितमपल्ली म्हणतात, "जंगल ही निसर्गाची अनुपम देणगी आहे. निसर्गाने दिलेला हा अमोल ठेवा अलीकडच्या काही वर्षात आपण सुरक्षित ठेवू शकलो नाही. एखाद्या दिवाळखोराप्रमाणे वनांविषयी आपली कृतघ्नतेची भावना वाढीस लागली आहे हे सांगण्याचा प्रयत्न मी केला आहे."[४०] यावरून चितमपल्लींची जंगलाच्या संरक्षणाविषयीची तळमळ दिसून येते. चितमपल्लींनी

अंतःकरणातील भाव साहित्याच्या रूपाने आपल्या समोर मांडले आहेत. वि. वा शिरवाडकर लिहितात की, "लेखक विशेषतः नवीन लेखक जेव्हा आपले काही साहित्य वाचकाच्या हातात ठेवतो तेव्हा त्या कागदाच्या रूपाने आपल्या जीवनाचा एक तुकडाच काढून तो तुमच्याजवळ देत असतो."[४१] याप्रमाणे चितमपल्लींचे सारे आयुष्यच जंगलाच्या सहवासात गेल्याने जंगल हे त्यांच्या जीवनाचा एक भाग बनले आहे. इतर ललित साहित्यिकापेक्षा चितमपल्लींच्या साहित्याचे वेगळेपण म्हणजे त्यांनी फक्त ललित लेखन केले आणि तेही मनापासून. नरहर कुरुंदकर म्हणतात, "ललित वाङमय हा इरावतींच्या आवडीचा व वाचनाचा खास भाग असला तरी त्यांच्या लेखनाचा आणि चिंतनाचा तो खास भाग नव्हता. त्यांचे मन फुलपाखराप्रमाणे अधूनमधून वेगवेगळ्या विषयाचा आस्वाद घेत इतस्ततः उडणारे असे नव्हते, जन्मभराचा व्यासंग त्यांनी एकाच विषयाचा केला तो समाजशास्त्राचा."[४२] तर ललित साहित्य हे चितमपल्लींच्या जीवनाचा एक भाग आहे चितमपल्ली म्हणतात, "जंगलातील वास्तव्यात मी वन्यजीव निरीक्षणाचा छंद लावून घेतला. उत्तरोत्तर त्यात माझी प्रगती होऊ लागली आणि मी बऱ्यापैकी लेखकही झालो."[४३] जंगलाविषयी जशी चितमपल्लींना ओढ आहे तशीच जंगलातील प्राण्यांविषयी त्यांच्या मनामध्ये विलक्षण माया आहे. या मायेपोटीच त्यांनी अनेक प्राणी स्वतःच्या घरात पाळले आणि ते प्राणीसुद्धा आपलेच आहेत असे समजून त्यांच्यावर प्रेम केले.

चितमपल्ली निसर्ग लेखक आहेत परंतु त्यांनी सृष्टीवरील प्रत्येक जीवाचे सूक्ष्म बारकाईने निरीक्षण करून त्याचा साहित्यात उल्लेख केला त्यांनी आपल्या साहित्यातून कोणालाही वेगळे केले नाही. चितमपल्ली लिहितात, "निसर्ग आणि माणूस वेगळा नाही जे नियम माणसाला तेच इतर प्राणीसृष्टीला लागू पडतात."[४४] सर्व समभावाची भावना ठेवून त्यांनी आपलेपणाने लेखन केले. त्यांनी प्राणी, पक्षांचा सारा जीवनवृत्तांत सांगितला आहे. ते म्हणतात, "पक्षी आणि प्राणी यांचा जीवन वृत्तांत सांगणाऱ्या कथा मराठीत लिहिल्या गेल्या नाहीत."[४५] चितमपल्लींचे हे मत यथार्थ वाटते कारण चितमपल्लींनी याबाबतीत स्वतः संशोधन केलेले आहे त्यामुळे त्यांना त्याचे भरपूर ज्ञान आहे. रा. ग. जाधव सागतात, "निसर्गात रमणारे अनेकजण असतात पण प्रत्येक जण मारुती चितमपल्ली होऊ शकत नाही."[४६] चितमपल्ली हे चांगले निसर्ग लेखक आहेत परंतु त्याहीपेक्षा त्यांच्याविषयी अधिक सांगायचे तर ते इतर साहित्यिकांपेक्षा वेगळे असे ललित साहित्यलेखक ठरतात.

# संदर्भ सूची


१. प्रा. जाधव रा. ग., वाङ्मयीन निबंधलेखन स्वरुप आणि साधने, पुणे, १९६७, पृ. ११.

२. तत्रैव, पृ. १९.

३. तत्रैव, पृ. ९७.

४. तत्रैव, पृ. १०९.

५. भागवत दुर्गा, पैस, चौथी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००२, पृ. २०.

६. कुलकर्णी मधु, ललित साहित्यातील आकृतीबंधाची जडणघडण, पुणे, १९८७, पृ. ५६

७. डॉ. लेले वामन केशव, ललितलेखन व शैली, नागपूर, १९८४, पृ. १०७.

८. तत्रैव, पृ. १६५.

९. तत्रैव, पृ. १६४.

१०. उनि, वाङ्मयीन निबंधलेखन स्वरुप आणि साधने, पृ. १२३

११. उनि, ललितलेखन व शैली, पृ. ११५.

१२. चितमपल्ली मारुती, सुवर्णगरुड, द्वितीय आवृती, नवचैतन्य प्रकाशन, मुंबई, २००३, प्रस्तावना.

१३. कुलकर्णी श्रीनिवास, डोह, चौथी आवृत्ती, मौज प्रकाशन गृह, मुंबई १९८९, पृ. ४९.

१४. भागवत दुर्गा, निसर्गोत्सव, प्रथमावृत्ती, दिलीप प्रकाशन, मुंबई, १९९६, प्रस्तावना.

१५. तत्रैव, पृ. प्रस्तावना.

१६. भागवत दुर्गा, ऋतूचक, चौथी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २००२, पृ. ३७.

१७. उनि, पैस, पृ. २०.

१८. कर्वे इरावती, परिपूर्ती, सहावी आवृत्ती, देशमुख आणि देशमुख कंपनी, पुणे१९६९, पृ. १९.

१९. शिरवाडकर वि. वा., आहे आणि नाही, द्वितीय आवृत्ती, पुणे, १९७५, पृ. ८८.

२०. चितमपल्ली मारुती, घरट्यापलिकडे, द्वितीय आवृती, नागपूर २००१, पृ. २६.

२१. तत्रैव, पृ. २५.

२२. उनि, सुवर्णगरूड, पृ. प्रस्तावना

२३. चितमपल्ली मारुती, रानवाटा, प्रथम आवृत्ती, साहित्यप्रसार केंद्र, नागपूर १९९१, पृ. ४९.

२४. चितमपल्ली मारुती, निसर्गवाचन, नवीन सुधारित आवृती, पुणे, २००५, पृ. ११२.

२५. कर्वे इरावती, परिपूर्ती, देशमुख आणि देशमुख कंपनी, पुणे, १९६९, पृ.१९.

२६. उनि, आहे आणि नाही, पृ. ६९.

२७. कुलकर्णी श्रीनिवास, डोह, चौथी आवृत्ती, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८९, पृ. ७.

२८. उनि, घरट्यापलिकडे, पृ. ६१.

२९. उनि, निसर्गवाचन, पृ. २६.

३०. तत्रैव, पृ. ६८.

३१. तत्रैव, पृ. ४२.

३२. कर्वे इरावती, गंगाजल, देशमुख आणि देशमुख कंपनी, पुणे १९७७, पृ. १४७.

३३. कोठावळे अशोक केशव, (संपा), ललित मासिक मुंबई, एप्रिल २००६, पृ. ६६.

३४. उनि, पैस, पृ. २०.

३५. कुलकर्णी अनिरुद्ध अनंत, (संपा), प्रदक्षिणा खंड २, पुणे १९९१, पृ. ३३०.

३६. उनि, पैस, पृ. प्रास्ताविक.

३७. चितमपल्ली मारुती, पक्षी जाय दिगंतरा, नागपूर १९८९, पृ. प्रस्तावना.

३८. संपादकीय, दैनिक ऐक्य, शनिवार, २८ जानेवारी, २००६, पृ. ४.

३९. जाधव रा. ग., पुढारी (बहार), रविवार, २० नोहेंबर, २००५.

४०. चितमपल्ली मारुती, जंगलाच देण, सातवी आवृती, नागपूर २००२, पृ. प्रस्तावना.

४१. उनि, आहे आणि नाही, पृ. ४३.

४२. उनि, गंगाजल, पृ. १९.

४३. चितमपल्ली मारुती, सुवर्णगरुड, द्वितीय आवृती, मुंबई, २००३. प्रस्तावना

४४. तत्रैव, प्रस्तावना

४५. तत्रैव, दुसरी आवृत्ती, प्रस्तावना.

४६. जाधव रा. ग., पुढारी (बहार), रविवार, २० नोहेंबर, २००५.